महा

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(CIN NO U40109 MH 2005 SGC 153646)

**अधीक्षक अभियंता (स्था) अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, कोल्हापूर**

**म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित, कोल्हापूर यांचे कार्यालय**

उद्योगभवन पहिला मजला असेंब्ली रोड, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ नागाळा पार्क, कोल्हापूर.४१६००३

जा.क्र. अअस्था/कोप/तां/टीजी-९५/ 00710 दिनांक :- 04 AUG 2020

## नोटीस

विषय :- सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता योजनेअंतर्गत यांना लॉटरी पध्दतीने कामे वाटप करण्यासंबंधी व्दितीय लॉटरी (२०२०-२१) मिटींग दि. ११/०८/२०२० रोजी घेणेबाबत.

संदर्भ :-1) I. E.& L Dept. GoM GR No. Misc-2015/CR-63/Energy-5 Dtd. 26-03-2015

2) MSETCL/CO/Tr. O&M/SE-II/EE-VIII/12883 Dtd. 05-12-2016

3) No. 1046 Dtd. 25-01-2018

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्थापत्य) यांना विनास्पर्धा थेट लॉटरी पध्दतीने कामे वाटपाची योजना महाराष्ट्र शासनाच्या निर्णय संदर्भ क्र. (१) अन्वये अधीन राहून महापारेषण कंपनीने संदर्भ क्र. (२) अन्वये लागू केली आहे.

सदर परिपत्रकाला अनुसरून अधीक्षक अभियंता (स्था) अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित, कोल्हापूर कार्यालयात सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता म्हणून दि. ३१.०७.२०२० पर्यंत नोंद केलेल्या (कोल्हापूर जिल्हास्थित) स्थापत्य अभियंत्यांना वाटप करावयाच्या कामाची लॉटरी दि. ११-०८-२०२० रोजी स. ११.०० वा. घेण्यात येणार आहे.

सदरील नोटीस ही दि. ०४/०८/२०२० रोजी प्रसिध्दीस देण्यात येत असून प्रसिध्दीच्या दिनांकापासून महापारेषण कंपनीच्या संकेत स्थळावर तसेच अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, म.रा.वि. पारेषण कंपनी मर्यादित, कोल्हापूर व कार्यकारी अभियंता (स्था), अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था विभाग, कोल्हापूर यांच्या कार्यालयांमध्ये नोटीस फलकावर उपलब्ध आहे. दि. ११-०८-२०२० रोजी स. ११.०० वा. खालील नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून व्दितीय लॉटरी (२०२०-२१) बैठक आयोजित करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सुशिक्षित बेराजगार स्थापत्य अभियंता यांनी लॉटरीसाठी उपस्थित राहतांना खालील तपशिल सोबत आणने बंधनकारक आहे.

अ. महाराष्ट्र शासनाची स्थापत्य कामासाठीची वैध अनुज्ञाप्ती.

ब. सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनेमध्ये एकूण केलेल्या व चालू असलेल्या कामाचा तपशिल.

क. रहिवासी प्रमाणपत्र व सर्व मूळ कागदपत्रे.

२) अधीक्षक अभियंता (स्था) अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित, कोल्हापूर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग जिल्हयात रहिवासी असलेल्या वैध सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता यांनाच या लॉटरीमध्ये भाग घेता येईल.

३) लॉटरी पध्दतीने कामे वाटपाच्या वेळेस सदर स्थापत्य अभियंता हा सुशिक्षित बेरोजगार असावा. तसेच तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा, अथवा सरकारी किंवा खाजगी आस्थापनेत नोकरी करत नसावा. उपस्थित असलेल्या सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास त्याला महापारेषण कंपनीने प्रदान केलेला नोंदणीकृत परवाना रदद् करण्यात येईल, तसेच महापारेषण कंपनीने या योजनेतर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

४) या लॉटरी प्रक्रियेसाठी अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित, कोल्हापूर या कार्यालयात दि. ३१-०७-२०२० पर्यंत नोंदणी झालेले अभियंत्यांनाच भाग घेता येईल.

५) यापूर्वी सुशिक्षित बेरोजगार अभियंता योजनेअंतर्गत काम केलेल्या अभियंत्याने काम पूर्ण झाले असलेबाबत अतिरिक्त कार्यकारी अभियंता व कार्यकारी अभियंता यांची सही व शेरा असलेले पुस्तक घेऊन स्वत: लॉटरी प्रक्रियेसाठी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. अनुपस्थितीत राहील्यास लॉटरी प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाही.

६) अभियंत्यांनी राजकीय व इतर दबाव आणल्यास लॉटरी प्रक्रियेतून कायमचे नाव रदद् करणेत येईल.

७) लॉटरी प्रक्रियेच्या समितीचा निर्णय बंधनकारक व अंतिम राहील.

८) लॉटरीमध्ये काम मिळणा-या सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याने अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या २५% इतक्या रक्कमेचा बॅंक पत दाखला (Solvency) कायदिश (Work order) देणेपूर्वी या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

सदर लॉटरी बैठक दि. ११-०८-२०२० रोजी स. ११.०० वाजता अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित, कोल्हापूर या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. वरील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणा-या वैध सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता (कोल्हापूर जिल्हास्थित) यांना आवाहन करण्यात येते कि, त्यांनी नियोजित वेळेस कागदपत्रांसोबत या कार्यालयात उपस्थित रहावे.

(सुनिल माने)
अधीक्षक अभियंता (स्था) प्रभारी तथा
अध्यक्ष सुबेअ लॉटरी प्रणाली समिती
कोल्हापूर

<u>प्रत सादर :-</u>

१) कार्यकारी अभियंता (स्था) अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था विभाग, कोल्हापूर. म.रा.वि. पारेषण कंपनी............ आपण वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या नियोजित वेळेस या कार्यालयात उपस्थित रहावे.

२) व्यवस्थापक (विवले) अउदा स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था मंडल, कोल्हापूर............ आपण वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या नियोजित वेळेस या कार्यालयात उपस्थित रहावे.

३) नोटीस बोर्ड.